# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./५४३७/२०२१ दि. १६/०४/२०२१

## सुधारीत परिपत्रक

**विषय:- कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) चा प्रार्दुभाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत..**
**(Break The Chain)**

संदर्भ:- १) शासन आदेश क्र. DMU/2020/CR,92/DisM-1, Dated 13 April, 2021
२) शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/२०२०कोरोना/मवि-१/५८८०, दि. १५/०४/२०२१
३) विद्यापीठाचे परिपत्रक क्र. गों.वि./आस्था./५४३४/२०२१, दि. १५/०४/२०२१
४) गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांच्या प्राचार्यासोबत झालेली ऑनलाईन बैठक, दि. १६/०४/२०२१

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयीन प्राचार्य तसेच गोंडवाना विद्यापीठातील शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख यांना याव्दारे सुचित करण्यात येते की, कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रार्दूभाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत शासनाचे व संचालनालयाचे आदेश प्राप्त आहेत. त्याअनुषंगाने गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच गोंडवाना विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील शिक्षक यांची उपस्थिती नियंत्रीत करण्याच्या अनुषंगाने दि. १६ एप्रिल, २०२१ रोजी मा. प्र-कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली संलग्नीत महाविद्यालयांतील प्राचार्यांसोबत ऑनलाईन सभा संपन्न झाली.

सदर संपन्न झालेल्या बैठकीच्या निर्णयानुसार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपस्थिती नियंत्रीत करण्याबाबत सुचना करण्यात आलेल्या असून त्यानुसार गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयीन प्राचार्य तसेच गोंडवाना विद्यापीठातील शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, यांनी कार्यवाही घेवून, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी विद्यापीठ प्रशासनास सादर करावा.

**संलग्नीत - बैठकीचे निर्णय/इतिवृत्त**

16-4-2021

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी माहितीस्तव व कार्यवाहीस्तव :-**

१) मा. कुलगुरू यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३) विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य.
४) विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख.
५) सिस्टिम ॲनालिस्ट, संगणक विभाग यांनी सदरहू परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याची कार्यवाही घ्यावी.
६) उपकुलसचिव, आस्थापना विभाग (नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेवून प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपस्थिती नियंत्रीत करण्याबाबत.**

महाराष्ट्र राज्यातील कोरोनाचा (Covid - 19) वाढता प्रादुर्भाव लक्षात घेवून प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून शासनातर्फे प्राप्त झालेल्या आदेशानूसार विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाचे कामकाज चालविण्या संदर्भात सुसूत्रता यावी या उदेशाने मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये शुक्रवार दिनांक १६ एप्रिल, २०२१ रोजी दुपारी ०३.०० वाजता विद्यापीठाचे सन्माननिय प्र. कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे यांच्या अध्यक्षतेखाली संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यां सोबत ऑनलाईन बैठक घेण्यात आली. सदर सभेला प्राचार्य फोरमचे अध्यक्ष डॉ एन.एस.कोकोडे (सचिव), डॉ. राजूभाऊ मुनघाटे (सचिव), विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता व विद्यापीठाचे कुलसचिव तसेच संलग्नित महाविद्यालयाचे बहुसंख्य प्राचार्य बैठकीस उपस्थित होते. सद्यस्थितीत दोन्ही जिल्हयात कोरोनाच्या वाढत्या परिस्थितीचा विचार करुन महाविद्यालयाचे कामकाज चालविण्याकरिता बैठकीमध्ये एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१. सर्व प्राध्यापकांना Work from home ची परवानगी असेल.
२. सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना 50% आळीपाळीने येण्याची परवानगी असेल.
३. प्राचार्यांना गरज असेल तेव्हा प्राध्यापक/कर्मचाऱ्यांना बोलविता येईल.
४. प्राध्यापकांनी केलेल्या कामाचा अहवाल आठवडयातून किमान एकदा सादर करणे बंधनकारक राहील.

शेवटी सभेला उपस्थित सन्माननिय प्र. कुलगुरु, विद्यापीठाचे अधिष्ठाता, उपस्थित सर्व प्राचार्य यांचे विद्यापीठातर्फे कुलसचिवांनी आभार व्यक्त करुन, मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त करण्यात आली.

16.4.2021
(डॉ. अनिल झेड. चिताडे)
कुलसचिव (प्रभारी)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

16/04/2021
Dr. Shriram S. Kawale
Pro-Vice-Chancellor (Officiating)
Gondwana University Gadchiroli
(डॉ. श्रीराम कावळे)
प्र. कुलगुरु (प्रभारी)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली